# प्रस्तावना

सांगोला शहराचा स्थानिक इतिहास लिहिण्याची प्रेरणा व मार्गदर्शन कै. ग.ह.खरे व मा.प्राचार्य होळकर यांनी केले. त्यांचा मी ऋणी आहे.

सांगोला नगरपालिकेचे संपूर्ण रेकॉर्ड पहाण्यास प्रशासक श्री भाटेसाहेब व मुख्याधिकारी मा.श्री.राज्योपाध्ये यानी परवानगी दिली.सध्याचे नगराध्यक्ष त्याचे सहकारी व कर्मचारी वर्गाने वेळोवेळी सहकार्य केले. नगरपालिकेचे १८५६ ते १९३० पर्यन्तचे रेकॉर्ड मोडीत होते त्याचे बाळबोध लिपीत रुपांतर श्री.दादोबा कुलकर्णी यानी करुन दिले. नगरपालिकेचे माजी नगराध्यक्ष,पदाधिकारी व सेवक वर्ग यांनी नगरपालिकेच्या प्रशासनाविषयी व विकासात्मक कार्याविषयी माहिती दिली या सर्वांचे मी आभार मानतो.

सांगोला येथील राजकीय सामाजिक चळवळीच्या माहितीसाठी स्वातंत्र्य सैनिकांनी, समाज सेवकांनी व विद्यमान आमदार इत्यादींनी मोलाचे सहकार्य केले या सर्वांचा मी आभारी आहे.

मुंबई येथील शासकीय पुरातत्व विभागाच्या पदाधिकाऱ्यांनी व त्यांच्या सेवकांनी सांगोल्याबाबतची राजकीय सामाजिक चळवळीबाबतचे रेकॉर्ड दिले. पुणे येथील भारत इतिहास संशोधक मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी व सेवकांनी सांगोल्याविषयीची प्रकाशित व अप्रकाशित साधने उपलब्ध करुन दिली. गोखले इन्स्टिट्यूट ऑफ पॅलिटिक्स अँण्ड सोशल सायन्सेसच्या ग्रंथपालनी सुरुवातीपासूनचे गॅझिटियरस्,सेन्सस् व इतर माहिती दिली.पुण्याच्या शासकीय पुरातत्व विभागाच्या संचालकांनी सांगोल्यातील पेशवेकालीन महसुल विषयीची माहिती मराठीमध्ये उपलब्ध करुन दिली. डॉ.के.एन.चिटणीस,डॉ.अ.रा. कुलकर्णी व डॉ.शोभना ताई गोखले यांनी मार्गदर्शन व सहकार्य केले. सांगोल्यातील राजकीय व सामाजिक चळवळीविषयीची माहिती दैनिक केसरी व सोलापूर समाचार,यांच्या संपादकांनी सर्व अंक पहाण्यास दिले. या सर्वांचे

मी मन:पूर्वक आभार मानतो.

माझ्या प्रबंधास माझे गुरुवर्य व मार्गदर्शक डॉ. व्ही.एस.कदम यांनी तर अगदी प्राथमिक ज्ञानापासून मला मार्गदर्शन केले व हा प्रबंध पूर्णत्वास आणला. यासाठी त्यांनी आपला अमूल्य वेळ सतत दिला. इतिहास विभागप्रमुख डॉ.बी.आर.कांबळे यांनी अडचणीच्या काळात मोलाचे सहकार्य व मार्गदर्शन केले. माझे मित्र डॉ.कृष्णा इंगोले यांनी हा प्रबंध पूर्ण करण्यास सतत मदत केली या सर्वांचा मी अत्यंत ऋणी आहे.

हा प्रबंध पूर्ण करण्यासाठी मा.प्राचार्य य.ना.कदम,प्राचार्य एन.एम. मगरे, प्राध्यापक बंधूनी व पत्नी सौ.सुधामती या सर्वांनी प्रत्यक्ष अप्रत्यक्ष सहकार्य केले या सर्वांचा मी आभारी आहे.

प्रा.बी.के. लोन्ढे.

# अनुक्रमणिका


| | | पृष्ट क्रमांक. |
|---|---|---|
| प्रकरण १. | प्रास्ताविक – विषयाचे महत्त्व<br>भौगोलिक परिस्थिती,<br>ऐतिहासिक परिस्थिती. | १ |
| प्रकरण २. | सांगोला नगरपालिका प्रशासन. | २७ |
| प्रकरण ३. | सांगोला नगरपालिकेची आर्थिक परिस्थिती. | ५१ |
| प्रकरण ४. | सांगोला नगरपालिका–लोकोपयोगी कार्य | ९० |
| प्रकरण ५. | सांगोल्यातील सामाजिक आणि राजकीय चळवळी. | १२३ |
| प्रकरण ६. | उपसंहार | १३९ |
| | परिशिष्टे | १४६ |
| | संदर्भ ग्रंथ | १६३ |

# सांगोला नगरपालिका सरहद्दीचा नकाशा

